# रंगात रंगला इंद्रधनू

भिजवीत रंगीत रंगांनी मेघांची तनू
नभांगणी खेळत होता रंगपंचमी इंद्रधनू
उधळलेले रंग त्याचे ओघळले भूमिवरी
रंगांनी रंगून गेली, पाने, फळे, फुले सारी
रंगून त्या रंगाने पक्षी लागले गुणगुणू
नभांगणी खेळत होता रंगपंचमी इंद्रधनू
सूर्यहि आला साथीला, उधळीत रंगीत किरणे
रंगून गेले नभांगण सारे मोहक रंगाने
हर्षभराने विहरत होत्या रानीवनी धेनू
नभांगणी खेळत होता रंगपंचमी इंद्रधनू
बघून तो रंगलेला खेळ, रंगले अंतरंग माझे
रंगू लागल्या कल्पनांच्या रंगावल्या रंगवीत स्वप्ने
मधुर सुरांनी बरसत होती हृदयांतरी वेणू
नभांगणी खेळत होता रंगपंचमी इंद्रधनू
फुलासंगे बागडणारी फुलपाखरेहि रंगली मोहक रंगाने
पाहून त्या सुंदरतेला मोहित झाली पाहणाऱ्यांची मने
मंद, शीतल जलधारांनी भिजून गेली तनू
नभांगणी खेळत होता, रंगपंचमी इंद्रधनू
पाहून तो रंगांचा सोहळा प्रसन्न झाली मने
वायुसंगे डोलू लागली दूरवर बहरलेली वने
हे परमेशा सांग तुझे मी आभार कसे मानू
नभांगणी खेळत होता रंगपंचमी इंद्रधनू

– पद्‌माकर चित्रे
('शब्दांची फुलपाखरे' या कवितासंग्रहातून)